**परिशिष्ठ 'अ'**

## विषय : उपक्रमाच्या कर्मचारी वसाहतीतील निवासस्थानाच्या वाटपाविषयीचे नियम अटी.

१ दिनांक ०१.१०.२०१९ रोजी कर्मचा-याची उपक्रमातील सेवा ०५ वर्षे कायमस्वरुपी पदावर पूर्ण झाली असली पाहिजे.

२ प्रतिक्षायादीवरील अर्जदाराला उपक्रमाच्या उपलब्ध असलेल्या गाळयांपैकी एका गाळयाचे वाटप करण्यात येईल. दिलेला गाळा स्विकारण्यास त्याने नकार दिल्यास त्यांचा वाटपावारील हक्क रद्द करुन त्याचे नांव प्रतिक्षायादीवरुन कमी करण्यात येईल आणि त्याने भरलेली प्रांरभिक ठेव रु.३००/- उपक्रमाकडे जप्त होईल.

३ गाळेवाटपाच्या दिवशी जे कर्मचारी उपस्थित रहाणार नाहीत त्यांचा गाळा वाटपावरील हक्क आपोआप रद्द होईल. त्यांची नावे प्रतिक्षायादीवरुन कमी करण्यात येईल आणि त्याने भरलेली प्रारंभिक ठेव रु.३००/- जप्त करण्यात येईल. परंतु, एखादा कर्मचारी गाळा वाटपाच्या दिवशी कोणत्याही प्रकारच्या रजेवर असल्यास, रजा समाप्तीनंतर सदर कर्मचा-यांने सात दिवसांच्या आत आपल्या विभाग प्रमुखांमार्फत गैरहजेरीचे कारण प्रमाणीत केलेले लेखी निवेदन घेवून गाळा वाटपाकरीता कल्याण विभागात हजर रहावे. सदर कर्मचा-यास तो कामावर रुजू होण्यापूर्वी जे शेवटचे गाळेवाटप झाले त्यातून जे गाळे शिल्लक असतील त्यातूनच गाळयाची निवड करावी लागेल.

४ सदर कर्मचारी उपस्थित राहूनही उपलब्ध गाळा स्विकारण्याचे कर्मचा-याने नाकारल्यास अथवा अनामत ठेव रु.३०००/- न भरल्यास अथवा दिलेल्या गाळयाचा ताबा सर्व अटी पूर्ण करुन सात दिवसांच्या आत न घेतल्यास त्याने भरलेली प्रांरभिक ठेव रु.३००/- जप्त करण्यात येईल.

५ जर कर्मचा-याने अनामत ठेव रु.३०००/- भरल्यानंतर गाळावाटपाच्या तारखेपासून सात दिवसांत करारपत्र केले नाही, तर त्याचा गाळावाटपावरील हक्क रद्द करण्यात येईल व प्रांरभिक ठेव रु.३००/- जप्त करण्यात येईल.

६ कर्मचा-यास वसाहतीतील गाळा नको असल्यास व प्रांरभिक ठेव रु.३००/- परत हवी असल्यास कर्मचा-यांनी गाळेवाटपासाठी बोलविण्यापूर्वी रितसर अर्ज कल्याण विभागात करणे आवश्यक आहे.

७ एखादया कर्मचा-यांविरुध्द कसुरीबद्दल किंवा निवासस्थानात राहण्यासंबंधीच्या नियमभंगाबद्दल गाळयामधून निष्कासित करण्याचा आदेश देण्यात आला असेल तर तो कर्मचारी पुन्हा नविन गाळा वाटपासाठी पात्र समजला जाणार नाही. ही वस्तुस्थिती लपविल्यास आणि खोटी माहिती दिल्यास त्याने भरलेली प्रांरभिक ठेव रु.३००/- जप्त करण्यात येईल. शिवाय त्याच्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

८ जर कर्मचा-यांच्या अगर त्यांच्या पत्नीच्या/तिच्या पतीच्या नावावर असलेले निवासस्थान/सदनिका ठाणे, बोरिवली व मानखुर्द च्या पुढे व कल्याण, विरार व नविन पनवेल या हद्दीत असेल व कर्मचा-यांने उपक्रमाच्या गृहखरेदी व्याज अनुदान योजनेचा लाभ घेतला असेल तर त्या कर्मचा-यास उपक्रमाच्या निवासस्थानाचा करार करण्यापूर्वी म्हणजेच गाळा वाटपाच्या दिनांकापासून ०७ दिवसांमध्ये सदर योजनेचा लाभ बंद करण्यात आल्याबद्दलचे प्रमाणपत्र उपक्रमाच्या लेखा विभागाकडून प्राप्त करुन ते गाळावाटप विभागास सादर करावे लागेल. अन्यथा, त्यास कर्मचारी निवासस्थान मिळण्यास पात्र समजण्यात येणार नाही.

९ जर कर्मचा-यांच्या अगर त्यांच्या पत्नीच्या/तिच्या पतीच्या नावावर असलेले निवासस्थान/सदनिका कल्याण, विरार व नविन पनवेल या सीमारेषांच्या बाहेर असेल व कर्मचारी जरी उपक्रमाच्या गृहखरेदी व्याज अनुदान योजनेचा लाभ घेतला असेल तरी तो कर्मचारी निवासस्थान मिळण्यास पात्र ठरेल.

१० : कर्मचा-याच्या अगर त्याच्या पत्नीच्या / तीच्या पतीच्या नावावर २४० चौरस फूट किंवा त्यापेक्षा अधिक बांधकाम क्षेत्रफळ असलेले निवासस्थान मुंबई बोरिवली, ठाणे, मानखुर्द पर्यंत असेल तर कर्मचारी निवासस्थान मिळण्यास अपात्र ठरेल. गाळा वाटपासाठी पात्रता ठरविताना अर्जदाराने दिलेली माहिती विभाग प्रमुखाने पडताळून पहावी व तद्नंतरच वेब बेस्ड प्रोग्राम मध्ये नोंद करावी.

११ उपक्रमाच्या कर्मचारी निवासस्थानाच्या वाटपाविषयाचे नियम व अट क्र. (९)आणि (१०) मध्ये नमूद केलेल्या विकल्पाबाबत कर्मचा-यांने वस्तुस्थिती लपविल्यास व खोटी माहिती अर्जामध्ये नमूद केल्याचे भविष्यात उघड झाल्यास किंवा त्याबाबतीत सदर कर्मचा-यां विरुध्द कोणतीही तक्रार आल्यास सदर कर्मचारी गाळाधारकांविरुध्द नियमानुसार चौकशी करुन त्याला वाटप केलेला गाळा नियमानुसार निष्कासित करुन ताब्यात घेण्यात येईल. तसेच, दिनांक ०३.१०.२००७ च्या मुसठ क्रमांक ३३१ नुसार सेवामुक्त गाळाधारक कर्मचा-यांनी त्यांना दिलेले गाळे खाली करुन दिले नाही तर ज्याप्रमाणे त्यांना दंडभाडे आकारण्यात येते त्याप्रमाणे सदर गाळाधारकास गाळावाटप झालेल्या दिनांकापासून ते गाळा सोडे पर्यंतच्या कालावधीकरिता दंडभाडे आकारण्यात येईल व सदर कर्मचारी स्थायी आदेशानुसार शिस्तभंगाच्या कारवाईस देखील पात्र ठरेल.

१२ कर्मचारी निवासस्थानासंबंधी अस्तित्वात असलेले व व्यवस्थापनाने वेळोवेळी केलेले नियम अर्जदारास बंधनकारक राहतील.

१३ केवळ विहीत प्रपत्रामध्ये अर्ज सादर केला म्हणून उपक्रमाच्या कर्मचारी निवासस्थानाच्या वाटपास कर्मचारी आपोआप पात्र ठरणार नाही. कोणतेही कारण न दर्शविता कर्मचा-याला निवासस्थानातील वाटपास अपात्र ठरविण्याचा अथवा कोणत्याही कर्मचा-यास निवासस्थानाचे वाटप करण्यास नाकारण्याचा हक्क उपक्रमाने राखून ठेवला आहे.

१४ प्रशासकीय आदेश क्र.२९९ दिनांक २६.११.२००१ नुसार एखादया कर्मचा-याने गृहनिर्माण कर्जावरील व्याजासाठी उपक्रमाकडून अर्थसहाय्य घेतले असेल तर त्याच्या मालकीच्या सदनिकेचा ताबा मिळाल्यावर बेस्ट उपक्रमाच्या कर्मचारी वसाहतीतील गाळा उपक्रमाकडे सुपूर्द करावा लागेल.

१५ प्रशासकीय आदेश क्र.२९९ दिनांक २६.११.२००१ नुसार कर्मचा-याने/कर्मचा-याच्या पत्नीने गृहनिर्माण कर्जावरील व्याजासाठी उपक्रमाकडून अर्थसहाय्य घेतले असेल तर त्याच्या स्वतःच्या मालकीच्या सदनिकेचा ताबा मिळाल्यावर बेस्ट उपक्रमाच्या कर्मचारी वसाहतीतील गाळा उपक्रमाकडे सुपूर्द करणे कर्मचा-यांवर बंधनकारक आहे. अन्यथा, नियमानुसार दंडात्मक भाडे आकारले जाईल.

१६ अर्ज करताना कर्मचारी अविवाहित असल्यास व तद्नंतर त्याने/तीने बेस्ट उपक्रमातील एखादया कर्मचा-याशी/अधिका-याशी विवाह केल्यास त्यासंबंधीचे माहिती कर्मचा-याने आपल्या विभागीय अधिका-याद्वारे कर्मचारी व्यवस्थापक (कल्याण) यांना त्वरित देण्याची जबाबदारी सर्वस्वी कर्मचा-यांची राहील.

१७ कर्मचा-याच्या कुटुंबातील अन्य व्यक्ती उपक्रमाच्या सेवेत असल्यास किंवा नंतर सेवेत रुजु झाल्यास व सदर व्यक्ती कर्मचा-यांसोबत त्यांना देण्यात येणा-या कर्मचारी निवासस्थानात वास्तव्य करणार असल्यास त्यांचा तपशील म्हणजे नाव, हुद्दा, परिचय क्रमांक, वे.पृ.क्र., विभाग, आगार ही माहिती कर्मचारीय व्यवस्थापक (कल्याण) यांना देणे कर्मचा-यांवर बंधनकारक राहील.

१८ कर्मचा-यांच्या पतीने/पत्नीने उपक्रमाच्या गृहखरेदी व्याज अनुदान योजनेचा लाभ घेतला आहे किंवा नाही याची माहिती देणे कर्मचा-यांवर बंधनकारक राहील.

१९ निवासस्थानासाठी कर्मचा-याने उपक्रमाच्या गृहखरेदी व्याज अनुदान योजनेचा लाभ घेतला आहे किंवा नाही याची माहिती देणे कर्मचा-यावर बंधनकारक राहील.

२० कर्मचा-यांच्या हुद्दा, वे.पृ.क्र., विभाग इत्यादिमध्ये बदल झाल्यास कल्याण विभागास त्वरीत कळविणे आवश्यक आहे.